05/04/19 5:40pm

Reg/ICD/2019-20/30

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web-www.dhepune.gov.in E-Mail : vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक.युएनआय-२०१८/दिविसो/(१९५/१८)/विशि /५५२८ दिनांक.०३.०४.२०१९

**न्यायालयीन प्रकरण/तात्काळ/आजच**

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

२. व्यवस्थापक, मालमत्ता विभाग(Estate Manger)/कार्यकारी अभियंता/
विद्यापीठ अभियंता/उपकुलसचिव (स्थापत्य)
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : जनहित याचिका क्रमांक.१०५/२०१८ आकांक्षा काळे**
**विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर**
**उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देणेबाबत...**

**संदर्भ : १.मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.३०.०८.२०१८ चे आदेश**
**२.संचालनालयाचे समक्रमांक दिनांक.२८.०३.२०१९ चे पत्र**

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रांचे अवलोकन व्हावे. संदर्भ क्रमांक.२ चे पत्रान्वये विषयांकित न्यायालयीन **प्रकरणी दिनांक.१६.०४.२०१९ रोजी पुढील** सुनावणी असून, सदर सुनावणीमध्ये **पुढील तिमाही अहवाल** सादर करणे आवश्यक असल्याने प्रस्तुत विषयी आपले विद्यापीठमार्फत केलेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची **आढावा बैठक दिनांक.०८.०४.२०१९ रोजी सकाळी ठिक.१०.०० वाजता शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे** येथे आयोजित केलेली असून, सदर बैठकीस पत्रामध्ये नमूद मुद्दयांबाबत वस्तुस्थितीदर्शक व प्रगतीदर्शक अहवालासह आपण व्यक्तीश: उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर बैठकीच्या ठिकाणामध्ये बदल केलेला असून, दिनांक.०८.०४.२०१९ रोजी सकाळी ठिक.१०.०० वाजता **सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे उपस्थित रहावे.**

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत,
१. श्रीमती वैशाली कोल्हे, सहयोगी प्राध्यापक, सेंटर फॉर डिसेबलीटी स्टडीज अॅण्ड अॅक्शन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२/-बैठकीची व्यवस्था करणेस विनंती आहे.

UE
Dir (SO)
03/04/19

Registrar

UNIVERSITY OF MUMBAI
03 APR 2019
330

05/04/19

P-A-R

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
web-www.dhepune.gov.in E-Mail : vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१२११५३

क्रमांक.युएनआय-२०१८/दिविसो/(१९५/१८)/विशि / 5192 दिनांक.२८.०३.२०१९

न्यायालयीन प्रकरण/तात्काळ/आजच

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

२. व्यवस्थापक, मालमत्ता विभाग(Estate Manger)/कार्यकारी अभियंता/
विद्यापीठ अभियंता/उपकुलसचिव (स्थापत्य)
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : जनहित याचिका क्रमांक.१०५/२०१८ आकांक्षा काळे
विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देणेबाबत...**

**संदर्भ : मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि.३०.०८.२०१८ चे आदेश**

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्रमांक.१०५/२०१८ मध्ये दिनांक.१८.०७.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीचे अनुषंगाने शासन निर्णय दिनांक.२७.०८.२०१८ निर्गमित केलेला असून, सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाचे दि.२९.८.२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच याबाबतचा आढावा घेण्यासाठी आत्तापर्यंत तीन बैठका घेण्यात आलेल्या आहेत व त्यामध्ये प्रस्तुत विषयी सविस्तर चर्चाही करण्यात आलेली आहे. प्रस्तुत विषयी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक.३०.०८.२०१८ चे आदेशान्वये शासन निर्णय दिनांक.२७.०८.२०१८ च्या अंमलबजावणीबाबतचा तिमाही अहवाल पुढील सुनावणीपूर्वी दिनांक.०३.१२.२०१८ पूर्वी सादर करण्याबाबत निर्देश दिलेले असल्याने, त्यास अनुसरुन आपले विद्यापीठामार्फत केलेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतचा प्राप्त तिमाही अहवाल संचालनालयाचे दिनांक.३०.११.२०१८ चे पत्रान्वये शासनास व दिनांक.०१.१२.२०१८ चे पत्रान्वये सहाय्यक सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर केलेला आहे.

मा.न्यायालयाचे संकेतस्थळावरील माहितीनुसार प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी दिनांक.१६.०४.२०१९ रोजी पुढील सुनावणी असून, सदर सुनावणीमध्ये पुढील तिमाही अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने प्रस्तुत विषयी आपले विद्यापीठमार्फत केलेल्या वा करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची आढावा बैठक दिनांक.०८.०४.२०१९ रोजी सकाळी ठिक.१०.०० वाजता शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे येथे आयोजित केलेली असून, सदर बैठकीस खालील मुद्दयांबाबतच्या वस्तुस्थितीदर्शक व प्रगतीदर्शक अहवालासह आपण व्यक्तीश: उपस्थित रहावे.

Scanned by CamScanner

१.दिव्यांग विद्यार्थ्यांना अडथळा विरहीत वातावरण निर्मितीसाठी/भौतिक सुविधांसाठी आत्तापर्यंत विद्यापीठाने केलेली कार्यवाही उदा. विद्यापीठामध्ये किती इमारती आहेत, त्यामध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत काय?, रॅम्पची सोय आहे का? नसल्यास त्याबाबत काय कार्यवाही सुरु आहे याची सविस्तर माहिती. तसेच विद्यापीठांच्या इमारतींमध्ये दिव्यांगांचा प्रवेश सुलभ आहे किंवा कसे याबाबत दिव्यांग क्षेत्रातील तज्ञाकडून लेखापरिक्षण करुन घेतले आहे का? नसल्यास कधीपर्यंत केले जाईल याची माहिती सादर करावी.

२.शासन निर्णयातील तरतूदींनुसार दिव्यांगांना ५% आरक्षण दिले जात आहे? याबाबतची माहिती.

३.दिव्यांग विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधांबाबतची माहिती- यामध्ये दिव्यांगांना वापरण्यास सुलभ अशी वेब-साईट आहे काय?, नसल्यास कधीपर्यंत उपलब्ध करुन दिली जाईल याची माहिती. सुगम्य ग्रंथालयाची सोय आहे का? दिव्यांगासाठी विकसीत करण्यात आलेली विविध सॉफ्टवेअर विद्यापीठामध्ये उपलब्ध आहेत काय? दिव्यांगांना शिक्षणामध्ये/अभ्यासक्रम आकलनामध्ये सुलभ होतील अशा पध्दती विद्यापीठामार्फत विकसित केलेल्या आहेत काय? नसल्यास त्यासाठी काय उपाययोजना केलेल्या आहेत वा भविष्यात करण्यात येणार आहेत याची माहिती.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत,

श्रीमती वैशाली कोल्हे, सहयोगी प्राध्यापक, सेंटर फॉर डिसेबलीटी स्टडीज अॅण्ड अॅक्शन, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

Scanned by CamScanner